# गोंडवाना विद्यापीठ,गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशि–५ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा. ३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापीत राज्य विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ च्या महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) द्वारा संचालित राज्य विद्यापीठ)

**(परीक्षा व मुल्यमापन मंडळ)**

कॉम्प्लेक्स परिसर, एम.आय.डी.सी.रोड, गडचिरोली–४४२६०५

दुरध्वनी क्रमांक:कार्यालय:०७१३२–२२३३२०

Email: director.boee@unigug.ac.in


जा.क्र./गों.वि./प.व.मु.मं/४८८६/२०२६ दि. १५/१०/२०२६

## परिपत्रक

**विषय:—** दुष्काळ सदृष्य तालुक्यातील हिवाळी २०२६ च्या परीक्षेचे शुल्क परत करण्याबाबत.

**संदर्भ:—** १) मा.शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण) पुणे यांचे पत्र दिनांक ३० सप्टेंबर २०२६

२) शालेय शिक्षण विभाग शासन निर्णय क्र.एफईडी–१५९२/१२०२/(११३२)/ साशि–५, दिनांक १८.१०.१९९३

३) मदत व पुनर्वसन विभाग शासन निर्णय क्र.समिती २६/प्र.क्र.८२/मदत/२, दि.२५.०९.२०२६ व १४ ऑक्टोबर २०२६ चे परीपत्रक

४) मा.उच्च व तंत्रशिक्षण महाराष्ट्र राज्य यांच्याशी झालेल्या दिनांक १४/१०/२०२६ रोजी सर्व विद्यापीठांच्या मा.कुलगुरू सोबत झालेली ऑनलाईन बैठक.

५) मा.संचालक, उच्च शिक्षण यांचेशी दिनांक १५/१०/२०२६ रोजी सर्व संचालक परीक्षा व मुल्यमापन मंडळ यांचेशी झालेल्या ऑनलाईन बैठक.

गोंडवाना विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयीन प्राचार्य व सर्व संबधितांना कळविण्यात येते की, दि. १४/१०/२०२६ रोजी मा .ना. चंद्रकांतदादा पाटील, उच्च व तंत्र शिक्षण मंत्री यांनी राज्यातील सर्व कुलगुरू महोदयांसमवेत ऑनलाईन बैठक घेतली होती. सदर बैठकीमध्ये हिवाळी २०२६ च्या परीक्षेसाठी परीक्षा आवेदनपत्र सादर करणाऱ्या दुष्काळ सदृष्य तालुक्यातील सर्व विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ केल्याचे सांगितलेले आहे.

त्याअनुषंगाने प्रस्तूत विद्यापीठाच्या हिवाळी –२०२६ च्या दुष्काळ सदृष्य तालुक्यातील सर्व अभ्यासक्रमाच्या परीक्षेसाठी ज्या विद्यार्थ्यांनी महाविद्यालयात परीक्षा शुल्क जमा केलेले आहे त्या महाविद्यालयांनी त्वरीत सदर शुल्क परत करावे. सदर शुल्क महाविद्यालयामार्फत विद्यापीठाकडे प्राप्त झालेले असल्यास महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क विद्यापीठ त्वरीत परत करेल. सदर आदेश दुष्काळ सदृष्य परिस्थिती असलेल्या तालुक्यातील महाविद्यालयाला लागु राहतील. सदर महाविद्यालयांनी संलग्नित प्रपत्र विवरण अ मध्ये माहीती भरून आणि विद्यापीठाकडे परीक्षा शुल्क जमा केल्याची पावती संलग्नित करून दि. २३.१०.२०२६ पूर्वी पाठवावी.

संलग्नित –प्रपत्र विवरण 'अ'

मा.कुलगुरू महोदयांचे आदेशानूसार

(डॉ.नविन मुंगले)
संचालक,
परीक्षा व मुल्यमापन मंडळ,

प्रतिलीपी:—

१) मा.कुलगुरू महोदयांचे स्विय सहाय्यक, गों.वि. गडचिरोली यांना माहितीस्तव सविनय सादर.
२) मा.प्र–कुलगुरू महोदयांचे स्विय सहाय्यक, गों.वि. गडचिरोली यांना माहितीस्तव सविनय सादर.
३) मा.प्राचार्य, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोलीशी संलग्नित सर्व महाविद्यालये
४) संगणक विभाग सदर परिपत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर अपलोड करणे

Scanned with OKEN Scanner

विवरणपत्र - अ

सन २०२६-२७ च्या दुष्काळसदृश्य तालूक्यातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ करण्याबाबत तपशिलाचे विवरणपत्र.

(रक्कम रुपयात)

| अ.क्र. | सन २०२६-२७ च्या दुष्काळसदृश्य तालूक्यातील ज्या विद्यार्थ्यांनी फी भरलेली आहे अशा विद्यार्थ्यांची संख्या | ज्या विद्यार्थ्यांनी फी भरली आहे अशा विद्यार्थ्यांच्या परिक्षा फी प्रतिपुर्ती साठी आवश्यक रक्कम | सन २०२६-२७ च्या दुष्काळसदृश्य तालूक्यातील ज्या विद्यार्थ्यांनी फी न भरता प्रमाणपत्र दिले आहेत अशा विद्यार्थ्यांची संख्या | ज्या विद्यार्थ्यांनी प्रमाणपत्र दाखल केले आहे अशा विद्यार्थ्यांच्या परिक्षा फी प्रतिपुर्ती साठी आवश्यक रक्कम | एकूण विद्यार्थी संख्या | एकूण प्रतिपुर्तीची रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |

स्वाक्षरी

Scanned with OKEN Scanner